# जनसंपर्क अधिकारी


**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२२-२३** **दिनांक :- १३/०७/२०२३**

## चोरी, जबरी चोरी करणा-या सराईत अरोपीतास अटक करुन गुन्हयातील मुददेमाल हस्तगत- मिरारोड पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या फिर्यादी नामे नियती अजय चौरोडीया, रा. राज ॲन्टीलिया, शिवार गार्डन, मिरारोड पुर्व या दिनांक ०९/०७/२०२३ रोजी सायं. ।वरुन आलेल्या अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे हातातील मोबाईल जबरीने हिसकावुन चोर०५.०० वाजेच्या सुमारास बेव्हर्ली पार्क, शनिमंदीर रोडने पायी चालत जात असताना त्यांचे पाठीमागुन मोटर सायकली करुन पळवुन घेवुन जाण्याचा प्रयत्न केलेबाबत फिर्याद दिल्याने मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं. I २६४/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रामाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे अल्ताफअली युनुस खान, वय. ३८ वर्षे, रा. शॉप नं.०३, पार्वती स्मृती, राजेश हॉटेल जवळ, भाईंदर पश्चिम ता.जि.ठाणे. यासा ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याचेकडुन जबरी चोरी केलेले एकुण ३ मोबाईल व मालवणी मालाड मुंबई येथुन चोरी केलेली १ मोटर सायकल असा मुद्देमाल हस्तगत करुन मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील २ जबरी चोरी व मुंबई शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मालवणी पोलीस ठाणे हद्दीतील १ मोटर सायकल चोरीचा असे एकुण ४ गुन्हे उघड करण्यात आले आहे. सदर गुन्हाचा तपास मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. किरण वंजारी हे करीत आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे.:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं., कायदा, कलम |
|---|---|---|
| १ | मिरारोड पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I २६४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९३ (मुळ गुन्हा) |
| २ | नयानगर पोलीस ठाणे | गु.रजि.नं.I ३८६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२ |
| ३ | नयानगर पोलीस ठाणे | गु.रजि.नं.I ३९४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२ |
| ४ | मालवणी पोलीस ठाणे | गु.रजि.नं I ४६८/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९ |

अटक अरोपीत अल्ताफअली युनुस खान हा सन २००८ पासुन चोरी व जबरी चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपी असुन त्याचेवर यापुर्वी इकडील तसेच मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातातील विविध पोलीस ठाण्यांत ०९ गुन्हे दाखल असल्याचा अभिलेख प्राप्त आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड, श्री. महेश तरडे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. विजयसिंह बागल, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले, पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, संजय बेडवाल, पो.अमं. अथर्व देवरे यांनी केलेली आहे.



**-----0000------**